| MHKO160001772026 | **पी.डब्ल्यू.डी.व्ही.अर्ज क्र. ०८/२०२६ मधील नि.क्र. ०५ खालील आदेश** |
|---|---|

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ अन्वये अंतरिम आदेश मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जाची थोडक्यात हकीकत अशी की,

अर्जदार आणि वि.प. यांचे लग्न हिंदू धर्मशास्त्र रितीरिवाजाप्रमाणे दि.१४/०७/१९९१ रोजी तुरूकवाडी, ता. शाहुवाडी येथे झाले असून त्यांचे पती-पत्नी असे नाते आजअखेर अस्तित्वात असून त्यांचे विवाहसंबंधातून त्यांना मंगेश हा एक मुलगा असून समृध्दी व नम्रता या मुली आहेत. वि.प. हे वनपरिक्षेत्र कार्यालय, मलकापूर येथे वनमजूर म्हणून काम करीत होते व आहेत. वि.प. यांनी अर्जदार हीस लग्नानंतर सुरवातीचे काही दिवस व्यवस्थित वागविले, मात्र त्यानंतर वि.प. हे दारूचे व्यसनी झालेने वि.प. चे वडिलांनी अर्जदार व वि.प. यांना मुलासहीत घरातून बाहेर काढले. वि.प. हे लग्नानंतर अर्जदारला दारू पिऊन विविध प्रकारे त्रास देऊ लागले. अर्जदार या चरीतार्थ चालविणेसाठी दुस-याचे शेतात मजूरीसाठी जात असत व तिने तिच्या दोन्ही मुलींची व मुलाची लग्ने लावून दिली आहेत. नोव्हेंबर २०२५ मध्ये वि.प. यांनी अर्जदारास किरकोळ कारणावरून दारू पिऊन अर्जदार हीचे डोक्यात लाकूड घातले व तुला पेटवून देतो असे म्हणून डिझेलचा कॅन व लायटर हातात घेऊन धमकी दिली. वि.प. हे त्यांचे नावे तुरूकवाडी येथील असलेली दोन्ही घरे व शेतजमीन विक्री करणार असलेची धमकी वारंवार अर्जदारला देत असतात. वि.प. हे एप्रिल २०२६ मध्ये सेवानिवृत्त होणार असलेने त्यातून त्यांना मिळणा-या आर्थिक लाभातून अर्जदार यांना वंचित ठेवणेची भाषा करीत आहेत. सध्या वि.प. हे अर्जदारला मानसिक, शारीरीक व आर्थिक त्रास देत आहेत. शेवटी, अर्जदार हीने वि.प. विरूध्द सदरचा मूळ अर्ज दाखल केला असून त्यामध्ये सदरचा अंतरिम अर्ज संरक्षणात्मक आदेश, दरमहा उदरनिर्वाहासाठी व औषधोपचारासाठी मासिक दहा हजार पोटगी, तसेच स्थावर व जंगम मालमत्ता हस्तांतरीत करू नये, तसेच वि.प. सेवानिवृत्त झालेनंतर मिळणा-या आर्थिक लाभ यामध्ये अर्जदाराचा हिस्सा असलेने सदर लाभ

स्थगित करणेचे आदेश पारीत करणेकरीता दाखल केला असून तो मंजूर करणेची विनंती केली आहे.

३. विरूध्द पक्षकार यांना सदर अर्जास नि.११ वर त्यांचे म्हणणे दाखल करून लग्नाबाबतचा व अपत्याबाबतचा मजकूर मान्य करून इतर सर्व मजकूर नाकारला आहे. त्यांनी वस्तुस्थितीमध्ये कथन केले की लग्नानंतर अर्जदार ही सुरवातीचे काही दिवस व्यवस्थित नांदली. तसेच वि.प. यांनी त्यांची मुलगी समृध्दी हीचे लग्न प्रॉव्हीडंट फंडातून कर्ज काढून करून दिले आहे. तसेच वि.प. यांनी मुलींच्या लग्नासाठी व घर बांधणेसाठी दहा लाख होम लोन काढले असून त्याचा हप्ता त्यांचे पगारातून कट होतो. साधारण तीन महिन्यापूर्वी अर्जदार व त्यांचा मुलगा मंगेश यांनी वि.प. यांना बेदम मारहान करून घरातून हाकलून दिले व त्याबाबत त्यांनी शाहुवाडी पो. ठाणेला तक्रार देखिल दाखल केली आहे. तेव्हापासून वि.प. हे भेडसगाव येथे भाड्याची रूम घेऊन स्वत: हाताने जेवण करून खातात. अर्जदार व त्यांचा मुलगा हे वि.प. चे नावे असलेली शेती कसून खातात व त्यातून त्यांना वार्षिक तीन ते चाल लाख रूपये उत्पन्न मिळते. अर्जदार हीने वि.प.चा स्वत:हून त्याग केलेला आहे. अर्जदारची मागणी बेकायदेशीर असून तशी मागणी अर्जदारला मागता येणार नाही. शेवटी, वि.प.ने अर्जदारचा सदरचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

४. प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत, मी त्याचा निष्कर्ष कारणांसहित नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार यांचेवर वि.प. यांचेकडून प्राथमिकतः कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे अर्जदार सिध्द करतात काय ? | होकारार्थी |
| २ | अर्जदार मागणी करतात त्याप्रमाणे अर्जदार या वि.प.कडून मूळ अर्जाचे निकालापावेतो उदरनिर्वाहाकरीता व औषधोपचारासाठी दरमहा दहा हजार रूपये अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? | अंशत: होकारार्थी. |
| ३ | अर्जदार मागणी करतात त्याप्रमाणे संरक्षणात्मक आदेश पारीत होवून मिळणेस अर्जदार पात्र आहेत काय ? | होकारार्थी, अंतिम आदेशानुसार. |

| | | |
|---|---|---|
| ४ | अर्जदार मागणी करतात त्याप्रमाणे वि.प.चे नावे असणारे घर व शेतजमिनी तसेच इतर स्थावर व जंगम मालमत्ता वि.प. यांनी कोणासही, कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करू नये अगर त्यावर कर्ज बोजे नोंद करू नये असा आज्ञार्थी आदेश पारीत होवून मिळणेस अर्जदार पात्र आहेत काय ? | अंशतः होकारार्थी. |
| ५ | अर्जदार मागणी करतात त्याप्रमाणे वि.प. यांना सेवानिवृत्तीतून मिळणा-या आर्थिक लाभ अर्जदार हीचे संमतीशिवाय काढू नये व त्याप्रमाणे संबंधित शासकीय कार्यालयास स्थगिती आदेश काढणेबाबत आदेश पारीत होवून मिळणेस अर्जदार पात्र आहेत काय ? | नकारार्थी. |
| ६ | आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा
## - मुद्दा क्र १ ते ६ करीता -

५. मी अर्जदार व वि.प. यांचे वादकथन, अभिलेखावरील दाखल केलेली कागदपत्रें यांचे अवलोकन केलेले आहे. अर्जदार यांनी नि.०३ व नि.१३ सोबत अर्जदाराने विवाहाचे फोटो, मिळकतींचे ७/१२ व ८अ उतारे, तालुकास्तरीय महिला समुपदेशन केंद्र शाहुवाडी यांचा अहवाल इ. कागदपत्रें दाखल केली आहेत. तसेच संरक्षण अधिकारी, अभय केंद्र, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर यांनी सदरकामी कौटुंबिक घटना अहवाल सादर केलेला आहे. अर्जदार हीने नि.१४ वर तर वि.प. यांनी नि.२२ वर त्यांचे तिचे मालमत्ता व कर्जासंबंधी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदार हीने तिचेतर्फे साक्षीदार समृध्दी दिग्वीजय पाटील, नम्रता सर्जेराव लाळे यांची प्रतिज्ञापत्रें नि.१४ व नि.१५ वर दाखल केली आहेत. याउलट वि.प. यांनी नि.२० व २१ वर साक्षीदारांची शपथपत्रें तसेच नि.२६ सोबत पगारपत्रक, फोटोग्राफ्स व वेतवसूलीचा उतारा इ. कागदपत्रें दाखल केलेले आहेत.

६. अर्जदार व वि.प. यांचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला, सर्व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार व वि.प. यांचे लग्न झाले असून सदर लग्नसंबंधातून त्यांना मंगेश हा मुलगा व समृध्दी, नम्रता या मुली आहेत व सदरच्या बाबीं दोन्ही पक्षकारांना मान्य व कबूल

आहे. अर्जदार हीने सदर अर्जाद्वारे कथन केले की वि.प. हे अर्जदारला मानसिक, शारीरीक व आर्थिक त्रास देत आहेत. तसेच नोव्हेंबर २०२५ मध्ये वि.प. यांनी अर्जदारास किरकोळ कारणावरून दारू पिऊन अर्जदार हीचे डोक्यात लाकूड घातले व तुला पेटवून देतो असे म्हणून डिझेलचा कॅन व लायटर हातात घेऊन धमकी दिली. वि.प. हे त्यांचे नावे तुरूकवाडी येथील असलेली दोन्ही घरे व शेतजमीन विक्री करणार असलेची धमकी वारंवार अर्जदारला देत असतात. तसेच वि.प. हे एप्रिल २०२६ मध्ये सेवानिवृत्त होणार असलेने त्यातून त्यांना मिळणा-या आर्थिक लाभातून अर्जदार यांना वंचित ठेवणेची भाषा करीत आहेत. याउलट, वि.प. यांनी अर्जदारची सदरची सर्व कथने नाकारून कथन केले की अर्जदार हीने वि.प.चा स्वत:हून त्याग केलेला आहे. वि.प. यांनी त्यांची मुलगी समृध्दी हीचे लग्न प्रॉव्हीडंट फंडातून कर्ज काढून करून दिले असून मुलींच्या लग्नासाठी व घर बांधणेसाठी त्यांनी दहा लाख होम लोन काढले आहे व त्याचा हप्ता त्यांचे पगारातून कट होतो. साधारण तीन महिन्यापूर्वी अर्जदार व त्यांचा मुलगा मंगेश यांनी वि.प. यांना बेदम मारहान करून घरातून हाकलून दिले असून त्याबाबत त्यांनी शाहुवाडी पो. ठाणेला तक्रार देखिल दाखल केली आहे. तसेच तेव्हापासून वि.प. हे भेडसगाव येथे भाड्याची रूम घेऊन स्वत: हाताने जेवण करून खातात. तसेच अर्जदार व त्यांचा मुलगा हे वि.प. चे नावे असलेली शेती कसून खातात व त्यातून त्यांना वार्षिक तीन ते चाल लाख रूपये उत्पन्न मिळते. दोन्ही बाजूंची परस्परविरोधी कथने पाहता याबाबत सविस्तर पुरावा अभिलेखावर येणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत केवळ तोंडी कथनांचे आधारे दोन्ही बाजूंनी कथन केलेल्या बाबीं ग्राह्य धरता येणार नाहीत व याबाबत पुरेसा व विस्तृत पुरावा अभिलेखावर येणे गरजेचे आहे. एकंदरीत अर्जदाराच्या विधीज्ञांचा युक्तिवाद विचारात घेता अर्जदाराचा प्रतुत अर्ज दाखल करण्यामागील उद्देश हा वि. प. याना सेवानिवृत्ती नंतर मिळणारे शासकीय लाभ वि. प. परस्पर विल्लेवाट लावतील या कारणास्तव स्थगित करण्यासाठी केला असल्याचे दिसून येते. त्यासाठी अर्जदारामार्फत वि.प. यांचा विरुद्ध कार्यालयामध्ये तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्याचे दिसून येते. *मा. उच्च न्यायालय, दिल्ली यांचेकडील एक्स विरुद्ध वाय, २०२४ एस सी सी ऑनलाईन २३३५, दि.२/४/२४* या न्यायनिर्णयामध्ये अधोरेखित केलेप्रमाणे तक्रारी खोट्या असोत किंवा खऱ्या, व्यावसायिक प्रतिष्ठा आणि आर्थिक कल्याणाला हानी पोहचविण्याचा उद्देशाने जोडीदाराच्या मालकाकडे अपमानास्पद तक्रारी करणे हे क्रूरतेशिवाय दुसरे काहीही नव्हते. प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराने केलेले अर्ज वि. प. यांच्या सेवानिवृत्तीच्या कालावधीत केले असल्याने वि. प. यांना अपमानास्पद असल्याचे दिसून येते. परंतु सध्या सदर बाबींच्या खोलात जाणे उचित ठरणारे नाही. मात्र सद्य स्थितीत अर्जदारने कथन केलेप्रमाणे ती व वि.प. हे विभक्त रहात असलेचे

प्रथमदर्शनी दिसते. तसेच वि.प. हे नोकरीस असून अर्जदारकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही व वि.प. यांनी अर्जदारचे उदरनिर्वाहाची कोणतीही सोय केलेली नाही असे प्रथमदर्शनी दिसते.

७. अर्जदार व वि.प. यांचे वैवाहीक नातेसंबंध कायम असताना अर्जदाराची पालनपोषणाची जबाबदारी वि.प. वर आहे. परंतू अभिलेखावरून असे दिसून येते की वि.प. सध्या अर्जदारापासून विभक्त रहात असून वि.प. हे अर्जदाराच्या पालनपोषणाची कोणतीही जबाबदारी पार पाडत नाहीत. सदरची बाब ही कौटुंबिक हिंसाचाराच्या सौज्ञेमध्ये येत असून अर्जदारावर प्राथमिकदृष्ट्या कौटुंबिक छळ झालेचे दर्शविण्यासाठी पुरेशी आहे.

८. वि.प. यांनी नि.२२ वरील दाखल केलेल्या मालमत्ता व कर्जासंबंधी प्रतिज्ञापत्रामध्ये ते सध्या नोकरीस असून त्यांना पगार असलेचे कथन केले आहे. तसेच वि.प. यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये व प्रतिज्ञापत्रामध्ये त्यांचे नावे दोन घरे व वडिलार्जित शेतमिळकती असलेचे देखिल मान्य केले आहे. वि.प. यांनी कथन केले की त्यांचे नावे असलेल्या शेतमिळकतींचे उत्पन्न त्यांची पत्नी व त्यांचा मुलगा मंगेश यांना मिळते, तथापि सदर बाबीस दुजोरा देणेसाठी त्यांनी सदरकामी कोणताही पुरावा सादर केलेला नाही. सबब, आजरोजी सदर घटनेबाबत निष्कर्ष नोंदविता येणार नाही.

९. अभिलेखावरील कागदपत्रांवरून वि.प. यांची वडिलार्जित शेतजमीन असून त्यांना पगार असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. अर्जदार व वि.प. यांच्या तीनही अपत्यांची लग्ने झाली असून त्यांच्या मुली त्यांचे सासरी रहात आहेत व त्यांचा मुलगा मंगेश हा देखिल विभक्त रहात आहे असे दिसते. अर्जदारवर आजरोजी कोणीही अवलंबून नसून ती सध्या तिचे घरात वि.प. पासून विभक्त रहात असलेचे प्रथमदर्शनी दिसते. तसेच अर्जदारकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून वि.प. हे नोकरीस आहेत व त्यांना उत्पन्नाचे साधन असलेचे दिसते. अभिलेखावरील पुराव्यावरून असे दिसते की वि.प. हे सध्या अर्जदारपासून विभक्त रहात आहेत व ते अर्जदारांच्या पालनपोषणाची कोणतीही जबाबदारी सद्य परिस्थितीत पार पाडत नाहीत. परंतु सध्या स्थितीला अर्जदार हि सासरी राहत असून वि. प. हे वेगळ्या ठिकाणी राहत असल्याचे दिसून येते. अर्जदार व वि. प. वेगवेगळे राहत असल्याबाबतची करणे परस्पर विरोधी असून त्याबाबत सविस्तर पुरावा अभिलेखावर येणे अपेक्षित आहे. सध्या स्थितीला अर्जदाराकडे उदरनिर्वाहासाठी कोणताही ठोस स्रोत दिसून येत नाही. याउलट वि. प. नोकरदार असून अभिलेखावर दाखल पगारपत्रक तसेच दोन्ही बाजूचा युक्तिवाद लक्ष्यात घेता

अर्जदार दिनांक ३१/०५/२०२६ रोजी सेवानिवृत्त झाल्याचे दिसून येते. तसेच वि. प. याना पेन्शन आहे किंवा कसे याबाबत दोन्ही पक्ष्यांची ओहापोह केलेला नाही. त्यामुळे अभिलेखावरील शपथपत्रे विचारात घेता वि. प. आज तारखेला नोकरदार आहेत असे म्हणता येणार नाही. परंतु, अर्जदार यांच्या उदरनिर्वाहाची तसेच दैनंदिन गरजांची जबाबदारी वि. प. याना टाळता येणार नाही. एकूणच अर्जदार व वि.प. यांच्या आर्थिक परिस्थितीचा व कौटुंबिक परिस्थितीचा एकंदरीत विचार करता अर्जदार हीस प्रस्तुतची केस चालविणे व दैनंदिन गरजा भागविणे यासाठी उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळणेस अर्जदार पात्र आहे. वि.प. हे अर्जदारपासून सध्या विभक्त रहात असले तरी त्यांची अर्जदारास सांभाळण्याची कायदेशीर व नैतीक जबाबदारी आहे व या जबाबदारीतून ते मुक्त होऊ शकत नाहीत. सबब, कौटुंबिक हिंसाचार कायद्याचा उद्देश पाहता व वरील सर्व बाबींचा विचार करता अर्जदार यांना वि.प. याचेकडून उदरनिर्वाहासाठी अंतरिम पोटगी मिळणेस अर्जदार पात्र आहेत. अर्जदार यांनी वि.प. विरुद्ध हिंसाचाराचे केलेले आरोप लक्ष्यात घेता तसेच कौटुंबिक हिसाचार कायद्याचा उद्देश पाहता अर्जदार हीने मागणी केलेप्रमाणे संरक्षणात्मक आदेश पारीत होवून मिळणेस देखिल अर्जदार पात्र आहेत.

१०. अर्जदार या सध्या त्यांचा मुलगा मंगेशसोबत तिचे घरी रहात असलेचे दिसत अभिलेखावरून दिसत आहे. वि.प. यांच्या मिळकतीमध्ये अर्जदाराचा पत्नी या नात्याने हक्क असून सदर मिळकतीमधून अर्जदारास बाजूला केल्यास अर्जदाराचे हक्कावर गदा येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सबब, अर्जदारने मागणी केलेप्रमाणे वि.प.चे नावे असणारे घर व शेतजमिनी तसेच इतर स्थावर व जंगम मालमत्ता वि.प. यांनी कोणासही, कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करू नये अगर त्यावर कर्ज बोजे नोंद करू नये असा आदेश वि.प. विरूध्द पारीत केल्यास वि.प. यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्जदार व वि. प. यांचे नातेसंबंध दृढ होण्यास मदत होईल. त्यामुळे अर्जदार स्थावर मालमत्तेसंदर्भात संरक्षणार्थ मनाई आदेश मिळणेस पात्र आहे.

११. अर्जदारने कथन केलेप्रमाणे वि.प. हे एप्रिल २०२६ मध्ये सेवानिवृत्त होणार असून वि.प. यांना मिळणारे आर्थिक लाभ अर्जदार हीचे संमतीशिवाय काढू नये व त्याप्रमाणे संबंधित शासकीय कार्यालयास स्थगिती आदेश काढणेत यावे अशी मागणी अर्जदारने केली आहे. परंतु अभिलेखावरील कागदपत्रे व युक्तिवाद विचारात घेता वि.प. हे ३१ मे २०२६ रोजी सेवानिवृत्त होत असल्याचे दिसून येते. अर्जदाराने वि. प. यांना मिळणारे निवृत्तिउत्तर शासकीय

लाभ वि.प. परस्पर विल्हेवाट लावतील अशी भीती व्यक्त केली आहे. परंतु सदर शासकीय लाभामध्ये वि.प. हयात असताना अर्जदाराचा हिस्सा आहे हे दर्शवणारा कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. त्याच बरोबर वि.प. सदर लाभांची परस्पर विल्हेवाट लावतील हे दर्शवणारा देखील कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. पुढे जाऊन प्रस्तुत कायद्या अंतर्गत दाखल केलेल्या अर्जामध्ये वि.प. यांना भविष्यात मिळणारे आर्थिक उत्पन्न किंवा लाभ थांबविनायबाबत कोणतीही कायदेशीर तरतूद नाही. तसेच तसे आदेश पारित करणे हे देखील वि.प. यांच्या अधिकारावर अतिक्रमण करणारे असून असंविधानिक ठरतील. त्यामुळे वि.प. सेवानिवृत्त होऊन त्यांना जे आर्थिक लाभ मिळतील ही घटना ही भविष्यातील होणारी घटना असून त्याबाबत आजरोजी आदेश पारीत करणे न्याययोग्य होणार नाही. सबब, सदरबाबत अर्जदार मागणी करीत असल्याप्रमाणे आदेश मिळणेस पात्र नाही.

१२. एकूणच, अर्जदार हीचेवर कौटुंबिक हिसाचार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. सबब, अर्जदार व वि.प. यांच्या कौटुंबिक व आर्थिक परिस्थितीचा विचार करता व कौटुंबिक हिंसाचार कायद्याचा उद्देश पाहता अर्जदार हीस प्रस्तुतची केस चालविणे व दैनंदिन गरजा भागविणे यासाठी उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने व वि.प. यांचेकडे अर्जदाराचा सांभाळ करण्याइतपत उत्पन्न असलेचे प्रथमदर्शनी दिसून येते. अर्जदार व वि.प. यांनी अभिलेखावर सादर केलेले कागदपत्रें पाहता वि.प. यास दि.३१/०५/२०२६ पर्यंत रक्कम रू.३०,४१२/- इतके मासिक वेतन सर्व कपातीअंती हातामध्ये मिळत असलेचे दिसून येते. त्याचबरोबर वि.प. यांचेकडून कोल्हापूर जिल्हा वनखाते कर्मचारी सह. पतसंस्था यांचेकडून कर्जवसूली चालू असलेचे दिसते. सदर कर्जवसूलीचा नेमका तपशील अभिलेखावर सादर नाही. परंतू वि.प. दि.३१/०५/२०२६ रोजी सेवानिवृत्त होत असलेने अर्जदाराने कथन केल्याप्रमाणे वि.प. यांना नोकरीतून उत्पन्न आहे असे सद्य स्थितीला म्हणता येणार नाही. असे असले तरी अर्जदार ही वि.प. याची पत्नी असलेमुळे तिच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी वि.प. यांना टाळता येणार नाही. अर्जदार व वि.प. यांचे राहाणीमान, तसेच अर्जदार व वि.प. यांची उत्पन्नाची साधने व अर्जदार व वि.प. यांचे वय विचारात घेता मूळ अर्जाच्या निकालापावेतो वि.प. यांनी अर्जदारास दरमहा तीन हजार अंतरिम पोटगी देणे न्यायोचित होईल. त्याचबरोबर उपरोक्त चर्चेमध्ये नमूद केलेप्रमाणे अर्जदार यांचा वि.प. यांच्या स्थावर मालमत्तेमध्ये हक्क अधिकार असलेने वि.प. यांनी अर्जदाराच्या पूर्व परवानगीशिवाय तिच्या हिश्याची स्थावर मालमत्ता तबदील करू नये असे मनाई आदेश मिळणेस अर्जदार पात्र आहे. तसेच अर्जदार मागणी करतात त्याप्रमाणे संरक्षणात्मक आदेश पारीत होवून मिळणेस अर्जदार पात्र आहेत.

उपरोक्त चर्चेनुसार वि.प. यांना सेवानिवृत्तीनंतर मिळणा-या लाभांबाबत अर्जदार मागणी करीत असल्याप्रमाणे आदेश पारीत करता येणार नाहीत. एकदरीत, वर नमूद प्रथमदर्शनी शाबित झालेल्या घटनेस अनुसरून मी मुद्दा क्र. १ व ३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे, मुद्दा क्र. २ व ४ चा निष्कर्ष अंशत: होकारार्थी नोंदवित आहे, मुद्दा क्र. ५ चा निष्कर्ष नकारार्थी नोदंवित आहे व मुद्दा क्र. ६ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** अर्ज नि.०५ अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**२.** वि.प. यांना आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अर्जदार यांना मुळ अर्जाचे निर्णयपावेतो उदरनिर्वाहासाठी दरमहा रक्कम रू.३,०००/- (रक्कम रू. तीन हजार फक्त) इतकी अंतरिम पोटगी प्रस्तुतचा अर्ज दाखल तारीख म्हणजे दि.१३/०३/२०२६ पासून मूळ अर्ज (निशानी क्र.१) निकाली होईपर्यंत द्यावी.

**३.** वि.प. यांनी अर्जदार हीस कोणतेही प्रकारे शारीरिक व मानसिक छळ होईल असे कोणतेही बेकायदेशीर कृत्य करू नये असा संरक्षणात्मक आदेश पारीत करण्यात येत आहे.

**४.** वि.प. यांनी अर्जदाराच्या पूर्व परवानगीशिवाय तिच्या हिश्याची स्थावर मालमत्ता तबदील करू नये असे मनाई आदेश पारीत करण्यात येत आहे.

**५.** सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना विनामुल्य अदा करणेत यावी.

**(खुल्या न्यायालयात घोषीत)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Pankaj Bhimrao Pawar

**दिनांक - ०१/०६/२०२६**

**( पी. बी. पवार )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**मलकापूर-शाहुवाडी, जि. कोल्हापुर**